"A"
GRADE
ACCREDITED
BY VNMKV,
PARBHANI

# राष्ट्रीय सेवा योजना

MAHATMA GANDHI MISSION



महात्मा गांधी मिशन

# एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालय

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी सलग्नीत

(ISO 9001 : 2015 Certified)

एमजीएम हिल्स, गांधेली, औरंगाबाद

www.mgmcft.org

# राष्ट्रीय सेवा योजना

## ॥ लक्ष्य गीत ॥

उठे समाज के लिये उठे – उठे
जगे स्वराष्ट्र के लिये जगे– जगे
स्वयं सजे वसुंधरा सवार दे – २

हम उठे उठेगा जग हुमारे संग साथियो
हम बढे तो: सब बढेंगे अपने आप साथीयो
जमी पे आसामा को उतार दे –२
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

उदासियो को दूर कर ख़ुशी को बांट्ते चले
गांव और शहर कि दुरियो को पाटते चले
ज्ञान को प्रचार दे प्रसार दे
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

समर्थ बाल वृद्ध और नारीया राहे सदा
हरे भरे बानो कि शील ओढती रहे सदा
तराक्क्रियो की एन नई कातर दे – २
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

ये जाती धर्म बोलीया बने न शूल राह की
बढाये बेल प्रेम कि अखंडता कि चाह की
भावना से ये चमन निखार दे
सदभावना से ये चमन निखर दे – २
स्वयं सजे वसुंधरा संवार दे – २

उठे समाज के लिये उठे – उठे
जगे स्वराष्ट्र के लिये जगे– जगे
स्वयं सजे वसुंधरा सवार दे – २

# राष्ट्रीय सेवा योजना

## त्रैवार्षिक अहवाल २०१६-१९

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
प्रा. एम. जी. भोसले
प्रा. पी. एस. वांढेकर

प्राचार्य
डॉ. आर. व्ही. काळे

MAHATMA GANDHI MISSION

## महात्मा गांधी मिशन अन्नतंत्र महाविद्यालय

(आय.एस.ओ. ९००१:२०१५ प्रमाणित)

(वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नीत)

एम.जी.एम. हिल्स, गांधेली, औरंगाबाद-४३१ ००७.



स्वावलंबन, स्वयंव्रत, स्वयंशिस्त आणि स्वाभिमान हे गुण परिसासम असून अंगी जोपासणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्याचं सोन करतात. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांतून हे सर्व गुण स्वयंसेवकाच्या अंगी रुजविले जातात. रासेयो द्वारा आयोजित विशेष शिबिरांतून समाजसेवेची आवड निर्माण होऊन आपण या देशाचे, समाजाचे काहीतरी देणे लागतो हि भावना तसेच आयोजित विविध स्पर्धांतून आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन स्वत:ला सिद्ध करून एखाद्या क्षेत्रात उत्तम करिअर करण्याचे धाडस याच काळात निर्माण होते.

चर्चासत्र आणि बौद्धिक व्याख्यानातून विचारांची अभिजातता निश्चयी आणि संयमी स्वरूपाची होण्यास मदत होते आणि अशा विचारांतून घडणाऱ्या व्यक्तिमत्वात धिरोदत्त स्वाभिमानासोबतच सात्विक दिव्यता अंगी रुजते. एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयात रासेयो अंतर्गत समाजपयोगी आणि व्यक्तिमत्व विकासासंबंधी अनेक उपक्रम राबविले जातात, याचंच फलित म्हणून महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांच्या संघाने राष्ट्रीय एकात्मता शिबिरात प्रथम पारितोषिक पटकावले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या या त्रैवार्षिक अहवालास शुभेच्छा !

**डॉ. व्ही.डी. पाटील**
संचालक (शिक्षण)



सद्विचार, सद्भावना, आणि सेवा हि त्रिसुत्री अंगिकारण हा सेवा या शब्दाचा खरा अर्थ असून राष्ट्रीय सेवेतल पहिल पाऊल आहे.

उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक ।
एकाविण एक कामा नये ।।

याप्रमाणे सद्विचाराशिवाय सद्भावना जागृत होणार नाही आणि या दोंन्हीशिवाय घडणाऱ्या सेवेमागे काहीतरी स्वार्थ किंवा अशुध्द उद्देश्य असतो. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पं. नेहरू यांच्या संकल्पनेतून महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्ष १९६९ ला डॉ. सी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रसेवेची भावना वृध्दिंगत व्हावी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली.

महाविद्यालयात रासेयो ची ५० विद्यार्थ्यांची तुकडी असून; कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. जी. भोसले आणि इतर प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली समाजपयोगी विविध उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येतात. प्रत्येक वर्षी सात दिवसीय विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास त्यांना प्रेरित करण्यात येते. विशेष शिबिरात चर्चासत्र, व्याख्याने, स्वच्छता मोहीम इत्यादी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात. महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी राष्ट्रीय एकात्मता शिबीर बेंगळुरू येथे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रमाचा लौकिक राष्ट्रीय पातळीवर पोहचवला त्यासाठी त्यांचे विशेष अभिनंदन. महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या या अहवालास शुभेच्छा.

धन्यवाद !

**डॉ. आर.व्ही. काळे**
**प्राचार्य**



देशाला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्ष झाली तरीही आजसुद्धा ग्रामीण भागाची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. आपण भारत हा महासत्ता होईल या दृष्टीकोनातून प्रयत्न करत असलो तरी हा विकास खेड्यापर्यंत पोहचला आहे काय? पोहोचला नाही तर त्या मागची कारणे शोधून ग्रामीण भाग विकासाच्या प्रवाहात आणणे हेच आजच्या युवकांचे महत्वाचे कर्तव्य आहे. स्वतःला आणि समाजाला परिपूर्ण बनविण्यासाठी विध्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करावे. शिबिरांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात युवकांचे श्रमदान, बौद्धिक मार्गदर्शन व रासेयोस शैक्षणिक अधिष्ठान प्राप्त होण्यास मदत होते.

रासेयो च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते तसेच सामाजिक, सांस्कृतिक विविधता, शैक्षणिक, आरोग्य या समस्यांचे निराकरण करताना ग्रामस्थांशी जवळचा सबंध, नाते प्रस्थापित करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते या संधीचा सर्व रासेयो स्वयंसेवकानी लाभ घेतला पाहिजे.

प्रा. एम.जी. भोसले
कार्यक्रम अधिकारी, रासेयो



वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्नीत महात्मा गांधी मिशन अन्नतंत्र महाविद्यालयाची स्थापना सन २००८-०९ मध्ये कायम विनाअनुदानित तत्वावर करण्यात आली. महात्मा गांधीजींच्या जीवनमूल्यांचा आदर करत; शिक्षण, सेवा आणि संशोधनाच्या माध्यमातून त्यांची मुलतत्वे जनमानसात रुजवणारी संस्था म्हणून महात्मा गांधी मिशनचा नावलौकिक आहे. गेल्या दशकभरात उत्तम दर्जाचे शिक्षण तसेच अन्नप्रक्रियेसाठी व प्रात्यक्षिकांसाठी लागणारी आधुनिक उपकरणे आणि सुविधा उपलब्ध करून देत ज्ञानदानाचे कार्य अविरत चालू आहे. भविष्यात संशोधन आणि विकास, नाविन्यपूर्ण अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान आणि जास्तीत जास्त प्रमाणात शेतीमालाच्या मुल्यावर्धानातून शेतीव्यवसायाचा व अन्न प्रक्रिया उद्योगांचा शाश्वत विकास करणे या उद्देशाशी महाविद्यालयीन प्रशासन कटिबद्ध आहे.

महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ८० असून ४ वर्षाचा बि. टेक . फूड टेक्नोलोजी हा पदवी अभ्यासक्रम शिकविला जातो. महात्मा गांधी मिशन, अन्नतंत्र महाविद्यालय, औरंगाबाद मध्ये सन २०१० -२०११ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजने चे ५० स्वयंसेवकाचे एक युनिट ची मान्यता मिळून राष्ट्रीय सेवा योजनचे कार्य सुरु झाले. महाविद्यालयातील प्रा. एम. जी. भोसले यांची प्राचार्य द्वारे कार्यक्रम अधिकारी म्हणून नेमणूक नोव्हेंबर २०१७ पासून करण्यात आली आहे.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना आणि माहिती | ०१ |
| २ | रासेयो विशेष शिबीर २०१६-१७ | ०५ |
| ३ | रासेयो विशेष शिबीर २०१७-१८ | ०८ |
| ४ | रासेयो विशेष शिबीर २०१८-१९ | १२ |
| ५ | रासेयो - राष्ट्रीय एकात्मता शिबीर २०१८ | १८ |
| ६ | रासेयो नियमित कार्यक्रम | १९ |
| ७ | रासेयो कार्यक्रमाची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल | १६ |

# राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना

राष्ट्रीय सेवा योजना हि संकल्पना सांगतांना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्व विशद करतात. विशेषत: शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळ्या स्तरावर राबविल्या जातात. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढताना दिसून येते.

डॉ. डी.एस. कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षणाच्या सर्वच टप्प्यांवर विद्यार्थी समाजसेवेशी जोडला जावा, अशी शिफारस १९६४-६६ दरम्यान केली आणि १९६७ मध्ये राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत एनसीसीसोबत एनएसएस असावे हे मान्य झाले. त्यानंतर कुलगुरूंच्या परिषदेत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वागत होऊन विद्यार्थ्यांच्या मनात श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, समाजाच्या सुख: दुखाशी त्यांनी समरस व्हावे, विविध समाजांच्या तळागाळापर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नाच्या जाणीवेतून कर्तव्य भावना निर्माण व्हावी तसेच समाजसेवा करत असताना त्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि व्यक्तिमत्व विकास साधताना समाजसेवा व राष्ट्रसेवा घडावी या उद्देशाने २४ सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने तेव्हाच शिक्षणमंत्री व्ही. के. आर व्ही राव यांनी देशातील ३७ विद्यापीठांत प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. सध्या देशातील १८० विद्यापीठातील ८ हजार महाविद्यालयातील २२ लाखाहून अधिक विद्यार्थी या योजनेत सक्रियपणे सहभागी झाले यावरुन या योजनेची विद्यार्थी वर्गातील आत्मीयता लक्षात येते.. २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून साजरा केला जातो.

Not me, but you; माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचिन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीसाठी असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे. नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबिर, सरकारच्या विविध कार्यक्रमांत सहभागी होतात.

महात्मा गांधींचा खेड्याकडे चला हा विचार घेऊन गावांमध्ये विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरांमार्फत निर्मलग्राम, सर्वांगीण व शाश्वत ग्रामविकास, चर खोदणे, रस्ते बांधणी, पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण, रक्तदान आदी कार्य श्रमदान, पथनाट्य, रॅली, उद्बोधक चर्चा, शिवारफेरी, गावकरी संवाद या माध्यमांतून समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात युवाशक्ती वा ऊर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे.

अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळ्या विचित्र घटना घडताना आपण पाहत आहोत. अशा परिस्थितीत आजचा तरुण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून समाजपरिवर्तन करण्याचे कार्य आज राष्ट्रीय सेवा योजनेचा तरुण करीत आहे. पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, सीसीटीव्हीचे काम, ग्रीन ऑडिट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, समाजाप्रती कन्यारत्न वाचवा अभियान, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक सर्वेक्षण आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातून करीत आहे. पंतप्रधान श्रीमंती इंदिरा गांधी यांनी या योजनेमुळे महाविद्यालयीन विद्यापीठीय युवकांना राष्ट्रीय छात्र सेनेप्रमाणे समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची नवी संधी मिळत आहे,असे म्हटलेले होते.

## राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच समाजसेवा करणे, आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमधे मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे, समाजसेवेच्या माध्यमातुन स्वतः च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे. या उद्देशाने ही योजना सुरू झाली. तिची प्रमुख उद्दीष्टे खालीलप्रमाणे

१. ज्या समाजात आपण काम करतो त्या समाजाला समजून घेणे
२. स्वतःला संबंधित समाजाला समजून घेण्यासाठी पात्र बनवणे
३. समाजाच्या गरजांची माहिती करून घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे. व त्या दूर करणे की, ज्यामुळे तो समाज सक्रिय बनेल
४. आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करून तिचा विकास करणे
५. आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यक्तीगत किंवा सामाजिक अडचणी दूर करून त्यावर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी करणे
६. समाजात मिसळण्यासाठी ज्या गुणांची गरज आहे, त्या गुणांचा आपल्यामध्ये विकास करणे
७. नेतृत्व गुण धारण करून लोकशाही प्रवृत्तीचा विकास करणे.
८. साक्षर व निरक्षर यांच्यातील दरी कमी करणे.
९. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करणे.
१०. समाजातील गरीब वर्गाची सेवा करण्याची ईच्छा मनात जागृत करणे.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य व चिन्ह

माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी

माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी हे ह्या योजनेचे बोधवाक्य आहे. ते आपणाला लोकशाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देते. नि:स्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. या बोधवाक्यत दुसर्या व्यक्तीचा दृष्टीकोन विचारात घेतला पाहिजे. हे सूचित होते तसेच, मानव प्राण्यांबद्दल सहानुभूती ठेवली पाहिजे. सामाजिक विकासातून व्यक्तिगत उत्कर्ष साधता येतो अशी वैश्विक कल्याणाची भावना मनात जागृत व्हायला पाहिजे. समाज हा अनेक व्यक्तिचा मिळून बनलेला असतो.

राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह हे ओरीसा राज्यातील कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. गतीमुळे सामाजिक परिवर्तन होऊ शकते व त्यासाठी आजच्या महाविद्यालयीन युवक युवतींना राष्ट्रीय सेवा योजना हे माध्यम आहे. त्या माध्यमातुन परिवर्तन करण्यासाठी हे चिन्ह घेतले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना दिवस

राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणुन प्रत्येक वर्षी ''२४ सप्टेंबर'' मानावा असे ठरवण्यात आले. त्या दिवशी विद्यापीठ पातळीवर तसेच महाविद्यालयामधील विविध कार्यक्रम आयोजित करावेत. (रक्तदान, नेत्रदान, आरोग्य शिबीर, गलीच्छ वस्ती निर्मूलन, वृक्षारोपण विशेष करून राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करताना स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

## योजनेचे स्वरुप

राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे दोन कार्यक्रम राबवली जातात

## नियमित कार्यक्रम

कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांला शैक्षणिक वर्षात १२० तास समाजसेवेचे काम महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या झोपडपट्टी किंवा ग्रामीण परिसरामधे करणे आवश्यक असते. या कार्यक्रमाअंतर्गत रोगप्रतिबंधक लसीकरण.,एड्स रोगप्रतिबंधक मार्गदर्शन, मोफत रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर वृक्षारोपण, रोग निदान शिबीर, ग्रामसफाई, साक्षरता, पर्यावरण, सामाजिक सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता आणि समाज जीवनाशी निगडित कार्यक्षेत्रात कार्य करण्यात येते.

## विशेष शिबीर कार्यक्रम

प्रत्येक घटक महाविद्यालयातर्फे वर्षातून एकदा दहा दिवसांचा निवासी शिबीर कार्यक्रम महाविद्यालयीन दत्तक घेतलेल्या गावी आयोजित येतो. या शिबिरामध्ये प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रामस्थांच्या सहकार्याने ग्राम सफाई, जलसंधारण, वृक्षारोपण, सर्वेक्षण, कच्चा रस्ता दुरुस्ती, शोषखड्डे, सोपा संडास, आरोग्य शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातुन सामाजिक विषयावर ग्रामस्थांचे उद्बोधक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

### रासेयो अंतर्गत घेण्यात येणार्या उपक्रमांची सूची

**१ . नियमित कार्यक्रम - दत्तक वस्ती /गाव व महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणारे कार्यक्रम :**

अ) नेतृत्व गुण विकास शिबीर

ब) नियोजन सत्र

क) आरोग्य तपासणी शिबीर

ड) शाळा दत्तक योजना

इ) स्वच्छता अभियान

फ) राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना कार्यक्रम

ग) लैंगिक समानता व महिलांसाठी विविध कार्यक्रम

ह) मतदार जनजागृती

ई) गुटखा तंबाखू विरोध व कर्करोग जाणीव जागृती कार्यक्रम

ज) वर्षभरातील महत्त्वाच्या दिवसांचे कार्यक्रम

क) मूल्यमापन सत्र

### २. विशेष शिबीर कार्यक्रम - दहा दिवसांच्या शिबिरात दत्तक गाव / वस्ती मध्ये घेण्यात येणारे उपक्रम खालीलप्रमाणे

अ) सामाजिक विषयावर जनजागृती (हुंडाविरोधी कार्यक्रम, अंधश्रध्दा निर्मूलन,बालविवाह, लोकसंख्या

ब) आरोग्य विषयक कार्यक्रम (एड्स क्षयरोगाबद्दल जनजागरण, आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शिबीर, रक्तदान शिबीर

क) पर्यावरण ( वृक्षारोपण, जलसंवर्धन, बंधारे बांधणी, रस्ते बांधणी)

ड) साक्षरता अभियान

इ) स्त्रियांचे सक्षमीकरण व स्वयंरोजगार, कायदेविषयक सल्ला

फ) आपत्कालिन सेवा

ग) राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना कार्यक्रम

# विशेष शिबीर २०१६-२०१७

## पहिला दिवस (१४. ०३. २०१७)

महाविद्यालयाचे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१७ मध्ये शरनापूर ता.जि. औरंगाबाद येथे दिनांक १४/०३/२०१७ ते २०/०३/२०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिरात २५ स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व ग्रामस्थ यांच्या सहभागाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून गावाचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याकरिता प्रयत्न केले. विशेष शिबिराचे उद्घाटन दि. १४/०३/२०१७ रोजी शरनापूर गावाचे प्रथम नागरिक (सरपंच) श्री. भाऊसाहेब कान्हेरे यांच्या हस्ते गावकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात झाले. सदरील कार्यक्रमास प्राचार्य डॉ. अशोक रोडगे व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

## दुसरा दिवस (१५. ०३. २०१७)

शरणापूर गावातील नागरिकांशी सुसंवाद साधून, गावातील काही मुख्य दुकाने आणि बाजारपेठेत जाऊन तसेच शाळेला भेट देऊन गावातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाचा आढावा घेण्यात आला. त्यासंदर्भात रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांनी चर्चा करून गावकऱ्यांमध्ये जनजागृती केली . दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## तिसरा दिवस (१६. ०३. २०१७)

वृक्ष हेचि संत मानी बुद्धिवंत या ओळींप्रमाणे गावकऱ्यांना वृक्षारोपणाचे महत्व पटवून देण्यात आले सोबतच गावामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## चौथा दिवस (१७. ०३. २०१७)

स्वयंसेवकांमध्ये सामाजिक भानासोबतच अभ्यास करत असलेल्या शाखेसंबंधीचे प्रात्यक्षिक ज्ञान वृद्धिंगत व्हावे म्हणून अन्नप्रक्रिया उद्योगाचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## पाचवा दिवस (१८. ०३. २०१७)

गावकऱ्यांच्या आरोग्यविषयक गरज लक्षात घेऊन एमजीएम मेडिकल कॉलेज आणि रासेयो एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गावकऱ्यांची आरोग्य तपासणी करून उपचार सेवा पुरविण्यात आली तसेच काही दुर्धर आजारांसंदर्भात रुग्णांचे समुपदेशन करण्यात आले, तात्काळ स्थितीमध्ये करण्यात येणारे प्राथमिक उपचार यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. अन्नपदार्थांची योग्य हाताळणी, स्वच्छता यांचे निरोगी आयुष्यात असलेले महत्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## सहावा दिवस (१९. ०३. २०१७)

आजही ग्रामीण भागात जनजागृतीच्या अभावामुळे बरेच लोक व्यसनाच्या आहारी जातात किंवा अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकतात त्यामुळे त्यांचे त्यांचे अतोनात नुकसान होऊन कुटुंबांची वाताहत होतांना दिसते. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वयंसेवकांनी पथनाट्य, चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात जनजागृती केली. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## सातवा दिवस (२०. ०३. २०१७) समारोप

निवासी शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गावाबद्दल आत्मीयता निर्माण झाली होती. गेल्या सहा दिवसांमध्ये गावात राबविलेले विविध उपक्रम,त्यांची झालेली अंबलबजावणी, त्यांमागचा उद्देश आणि त्यातून होणारी जनजागृती याबाबत कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना समुपदेशनपर मार्गदर्शन केले. वृद्धिंगत झालेले समाजभान, ग्रामीण जीवनाचे अनुभव सोबत घेऊन स्वयंसेवकांनी गावाचा निरोप घेतला आणि या विशेष शिबिराचा समारोप करण्यात आला.

### शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवकांची यादी

| Sr. No. | Registration No. | Name of Volunteers |
|---|---|---|
| 1. | MGM/FT/14/02 | Agre Vikas Vaman |
| 2. | MGM/FT/14/03 | Ms.Athwale Supriya Prakash |
| 3. | MGM/FT/14/04 | Atole Yogesh Sopanrao |
| 4. | MGM/FT/14/09 | Ms.Bansode Shubhangi Shankar |
| 5. | MGM/FT/14/16 | Chothe Sagar Nandkishor |
| 6. | MGM/FT/14/18 | Ghaywat Niraj Bandurao |
| 7. | MGM/FT/14/22 | Gore Gorakh Ganpat |
| 8. | MGM/FT/14/27 | Hotkar Asman Bhausaheb |
| 9. | MGM/FT/14/28 | Ms.Ingle Rashmi Rajendrasingh |
| 10. | MGM/FT/14/30 | Jadhav Rahul Madhavrao |
| 11. | MGM/FT/14/31 | Jadhav Shivam Subhash |
| 12. | MGM/FT/14/34 | Jadhav Yogesh Kakasaheb |
| 13. | MGM/FT/14/42 | Ms.Labde Snehal Bharat |
| 14. | MGM/FT/14/44 | Lokade Datta Shankarrao |
| 15. | MGM/FT/14/46 | Markad Sanket Sambhaji |
| 16. | MGM/FT/14/55 | Pargavkar Omprakash Mahadar |
| 17. | MGM/FT/14/57 | Patekar Dayanand Bhimrao |
| 18. | MGM/FT/14/58 | Pathan Shahidkha Mahebubkha |
| 19. | MGM/FT/14/60 | Ms.Patil Nipun Suresh |
| 20. | MGM/FT/14/61 | Ms.Patodi Payal Dinesh |
| 21. | MGM/FT/14/62 | Ms.Patole Mrudula Ajay |
| 22. | MGM/FT/14/64 | Ms.Pawar Vaishnavi Shivaji |
| 23. | MGM/FT/14/70 | Ms.Shelke Deepanjali Rajeshwar |
| 24. | MGM/FT/14/78 | Wagh Umesh Shahadeo |
| 25. | MGM/FT/14/79 | Wandhekar Akash Vijay |


MGM COLLEGE OF
FOOD TECHNOLOGY
GANDHELI, AURANGABAD
NATIONAL SERVICE SCHEME


MGM COLLEGE OF
FOOD TECHNOLOGY
NATIONAL SERVICE SCHEME




NATIONAL SERVICE SCHEME


AVM FOODS & AGRO
FRUIT PROCESSING UNIT



# विशेष शिबीर २०१७-२०१८

महाविद्यालयाचे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१८ मध्ये पाटोदा ता.जि. औरंगाबाद येथे दिनांक ०५/०२/२०१८ ते ११/०२/२०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिरात २५ स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व ग्रामस्थ यांच्या सहभागाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून गावाचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याकरिता प्रयत्न केले.

## पहिला दिवस (०५.०२.२०१८)

विशेष शिबिराचे उद्घाटन दि. ०५/०२/२०१८ रोजी पाटोदा गावाचे प्रथम नागरिक (सरपंच) श्री. भास्करराव पेरे पाटील यांच्या हस्ते गावकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात झाले. सदरील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी एम जि एम चे कृषी संचालक डॉ. जी.आर. रेड्डी, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ई. एस. पाटील व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांनी गावातील शाळा, मंदिर, रस्ते इत्यादी ठिकाणी साफसफाई केली.

## दुसरा दिवस (०६/०२/२०१८)

स्वावलंबन, स्वयंप्रेरणा आणि स्वयंव्रत हे गुण परिसासम असून आनंदी जीवन जगण्यासाठी अतिशय महत्वाचे आहेत. विद्यार्थीदशेत हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे तसेच कार्यात कुशलता यावी म्हणून विद्यार्थ्यांना योगाचे महत्व पटवून देण्यात आले. त्यादिवशीपासून विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी अन्न शिजवले व गटागटाने सर्वांना वितरित केले. दिवसभरात विद्यार्थ्यांनी गावात स्वच्छतेविषयी जनजागृती करून स्वच्छता अभियान राबविले. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## तिसरा दिवस (०७.०२.२०१८)

पाटोदा गावातील नागरिकांशी सुसंवाद साधून, गावातील काही मुख्य दुकाने आणि बाजारपेठेत जाऊन तसेच शाळेला भेट देऊन गावातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाचा आढावा घेण्यात आला. त्यासंदर्भात रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांनी चर्चा करून गावकऱ्यांमध्ये जनजागृती केली . गावातील शाळेत स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यात येऊन स्पर्धेतील उत्साह वाढवण्यात आला.काही स्वयंसेवकांनी समुपदेशनपर व्याख्याने दिली.दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## चौथा दिवस (०८/०२/२०१८)

आजही ग्रामीण भागात जनजागृतीच्या अभावामुळे बरेच लोक व्यसनाच्या आहारी जातात किंवा अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकतात त्यामुळे त्यांचे त्यांचे अतोनात नुकसान होऊन कुटुंबांची वाताहत होतांना दिसते. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वयंसेवकांनी पथनाट्य, चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात जनजागृती केली. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## पाचवा दिवस (०९/०२/२०१८)

स्वयंसेवकांनी गावातील स्मशानभूमीची स्वच्छता केली. सदरील कृतीमागे स्मशानभूमीसंदर्भात असलेल्या अंधश्रद्धा दंतकथांना आळा घालणे हा उद्देश होता.

## सहावा दिवस ( १०/०२/२०१८)

बचतगटाच्या माध्यमातून लघु स्तरावर शेतमालाची प्रक्रिया करून अधिक उत्पन्न मिळू शकते म्हणून स्वयंसेवकांनी यादिवशी गावातील बचतगटांना अन्नप्रक्रिया व साठवण यावर गावातील बचत गटांना मार्गदर्शन व प्रत्यक्ष प्रात्याक्षिके दिले सतेच स्वयंसेवकांना जालना जि प सीईओ निपुण विनायक यांनी मार्गदर्शन केले.

## सातवा दिवस (११.०२.२०१८) समारोप

निवासी शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गावाबद्दल आत्मीयता निर्माण झाली होती. गेल्या सहा दिवसांमध्ये गावात राबविलेले विविध उपक्रम,त्यांची झालेली अंबलबजावणी, त्यांमागचा उद्देश आणि त्यातून होणारी जनजागृती याबाबत कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना समुपदेशनपर मार्गदर्शन केले. वृद्धिंगत झालेले समाजभान, ग्रामीण जीवनाचे अनुभव सोबत घेऊन स्वयंसेवकांनी गावाचा निरोप घेतला आणि या विशेष शिबिराचा समारोप करण्यात आला.

### शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवकांची यादी

| Sr. No. | Registration No. | Name of Volunteers |
|---|---|---|
| 1. | MGM/FT/15/03 | Banthiya Saurabh Rameshchand |
| 2. | MGM/FT/15/07 | Ms.Bilapatte Tejaswini G. |
| 3. | MGM/FT/15/12 | Ms.Chittare Dipali Prakash |
| 4. | MGM/FT/15/20 | Dudhate Swapnil S. |
| 5. | MGM/FT/15/23 | Ms.Gaikwad Shilpa Bhagwan |
| 6. | MGM/FT/15/27 | Ghusalkar Abhishek Ravikumar |
| 7. | MGM/FT/15/32 | Inamdar Saifoddin A. |
| 8. | MGM/FT/15/33 | Jadhav Sarvesh Arunrao |
| 9. | MGM/FT/15/34 | Jadhav Vinayak Kanhu |
| 10. | MGM/FT/15/36 | Jogi Akshay Pundlik |
| 11. | MGM/FT/15/39 | Kawarkhe Dnyaneshwar R. |
| 12. | MGM/FT/15/41 | Kharat Pradip Piraji |
| 13. | MGM/FT/15/42 | Ms.Khupse Shilpa R. |
| 14. | MGM/FT/15/51 | Mutkule Eknath Maroti |
| 15. | MGM/FT/15/55 | Pawar Om Yeshwant |

| | | |
|---|---|---|
| 16. | MGM/FT/15/56 | Pole Rushikesh Subhash |
| 17. | MGM/FT/15/60 | Rathod Rahul Madhavrao |
| 18. | MGM/FT/15/62 | Sangale Rohidas Gopinath |
| 19. | MGM/FT/15/64 | Ms.Shinde Sanjana C. |
| 20. | MGM/FT/15/69 | Surkante Satyam Lingareddy |
| 21. | MGM/FT/15/71 | Talekar Gaurav Narayan |
| 22. | MGM/FT/15/72 | Ms.Thamke Shresthi Suresh |
| 23. | MGM/FT/15/74 | Tipare Digambar Munjabhau |
| 24. | MGM/FT/15/76 | Ms.Vangujare Seema P. |
| 25. | MGM/FT/15/80 | Ms.Wetal Tejal Prakash |


















MGM COLLEGE OF
FOOD TECHNOLOGY
NATIONAL SERVICE SCHEME




कार्यालय



# विशेष शिबीर २०१८-२०१९

महाविद्यालयाचे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर भिंदोन ता.जि. औरंगाबाद येथे दिनांक २१/०२/२०१९ ते २७/०२/२०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिरात २५ स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व ग्रामस्थ यांच्या सहभागाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून गावाचा सर्वांगीण विकास कसा करता येईल याकरिता प्रयत्न केले.

## पहिला दिवस (२१.०२.२०१९)

विशेष शिबिराचे उद्घाटन दि. २१/०२/२०१९ रोजी भिंदोन गावाचे प्रथम नागरिक (सरपंच) श्रीमती. आशाबाई बद्रीनाथ शिंदे यांच्या हस्ते गावकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात झाले, प्रमुख मार्गदर्शक श्री. प्रशांत अवसरमल (जलक्रांती ग्रुप महाराष्ट्र राज्य) यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी व देशाच्या विकासासाठी जलक्रांती ची गरज आहे यावर मार्गदर्शन केले, सदरील कार्यक्रमास  एम जि एम कृषी संचालक डॉ. जी.आर. रेड्डी, डॉ. निलेश मस्के ( वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख के व्ही के गांधेली ), डॉ. आर. व्ही. काळे ( प्राचार्य, अन्नतंत्र महाविद्यालय ), डॉ. पांडे सर, डॉ. चव्हाण सर व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.उद्घाटन कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांनी गावातील शाळा, मंदिर, रस्ते इत्यादी ठिकाणी साफसफाई  केली. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## दुसरा दिवस (२२.०२.२०१९)

स्वावलंबन, स्वयंप्रेरणा आणि स्वयंव्रत हे गुण परिसासम असून आनंदी जीवन जगण्यासाठी अतिशय महत्वाचे आहेत. विद्यार्थीदशेत हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे तसेच कार्यात कुशलता यावी म्हणून विद्यार्थ्यांना योगाचे महत्व पटवून देण्यात आले. त्यादिवशीपासून विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी अन्न शिजवले व गटागटाने सर्वांना वितरित केले. दिवसभरात विद्यार्थ्यांनी गावात स्वच्छतेविषयी जनजागृती करून स्वच्छता अभियान राबविले. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## तिसरा दिवस (२३.०२.२०१९)

शाळा सुशोभीकरण मोहिमेद्वारे रा से यो स्वयंसेवकांनी जि. प. प्रा. शाळा सुंदर व आकर्षक दिसावी याकरिता शाळेत पथ तयार केले व रंग दिला. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## चौथा दिवस (२४.०२.२०१९)

रा से यो स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता अभियान राबवून ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## पाचवा दिवस (२५.०२.२०१९)

रा से यो स्वयंसेवकांनी पाण्याचे महत्व व नियोजनाचे महत्व गावकर्यांना समजावण्यासाठी  रेन वाटर हार्वेस्टिंग, पाणी आडवा पाणी जिरवा व कचरा व्यवस्थापन यावर पथनाट्य व प्रभातफेरी काढून जनजागृती केली. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## सहावा दिवस (२६.०२.२०१९)

गावकऱ्यांच्या आरोग्यविषयक गरज लक्षात घेऊन एमजीएम मेडिकल कॉलेज आणि रासेयो एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गावकऱ्यांची आरोग्य तपासणी करून उपचार सेवा पुरविण्यात आली तसेच काही दुर्धर आजारांसंदर्भात रुग्णांचे समुपदेशन करण्यात आले, तात्काळ स्थितीमध्ये करण्यात येणारे प्राथमिक उपचार यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. अन्नपदार्थांची योग्य हाताळणी, स्वछता यांचे निरोगी आयुष्यात असलेले महत्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य शिबिरात गावातील १८० रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

## सातवा दिवस (२७.०२.२०१९) समारोप

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक व शारीरिक विकास व्हावा याकरिता, व्यक्तिमत्व विकास या विषयावर स्वयंसेवकांना व शाळेतील विद्यार्थ्यांना डॉ. नंदा देशमुख (प्राध्यापिका, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले. निवासी शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गावाबद्दल आत्मीयता निर्माण झाली होती. गेल्या सहा दिवसांमध्ये गावात राबविलेले विविध उपक्रम,त्यांची झालेली अंबलबजावणी, त्यांमागचा उद्देश आणि त्यातून होणारी जनजागृती याबाबत कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना समुपदेशनपर मार्गदर्शन केले. वृद्धिंगत झालेले समाजभान, ग्रामीण जीवनाचे अनुभव सोबत घेऊन स्वयंसेवकांनी गावाचा निरोप घेतला आणि या विशेष शिबिराचा समारोप करण्यात आला. दैनंदिन डायरी लिहण्यात आली.

### शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवकांची यादी

| Sr. No. | Registration No. | Name of Volunteers |
|---|---|---|
| 1. | 2016MGMCFT03B | Bane Ajay Manohar |
| 2. | 2016MGMCFT04B | Bhalerao Akshay Asaram |
| 3. | 2016MGMCFT06B | Biradar Vishnu Vijaykumar |
| 4. | 2016MGMCFT15B | Ms .Dhas Komal Yedba |
| 5. | 2016MGMCFT17B | Ms .Dhurve Komal Kishanrao |
| 6. | 2016MGMCFT20B | Ms. Gaikwad Ashwini Ravindra |
| 7. | 2016MGMCFT21B | Gaikwad Kalpesh Sanjay |
| 8. | 2016MGMCFT23B | Ms. Ghuge Kiran Janardhan |
| 9. | 2016MGMCFT25B | Gore Mayur Dilip |
| 10. | 2016MGMCFT32B | Jagtap Nitin Gorakh |
| 11. | 2016MGMCFT34B | Ms. Kadam Komal Raju |
| 12. | 2016MGMCFT35B | Ms.Kale Prajyoti Pratham |
| 13. | 2016MGMCFT36B | Kamble Pravin Ramkrishna |
| 14. | 2016MGMCFT37B | Kardile Saurabh Digamber |
| 15. | 2016MGMCFT40B | Kirdant Ritesh Jeevanrao |

| | | |
|---|---|---|
| 16. | 2016MGMCFT49B | Markande Abhishek Satish |
| 17. | 2016MGMCFT51B | More Dnyaneshwar K. |
| 18. | 2016MGMCFT52B | Patil Shantanu Sharadrao |
| 19. | 2016MGMCFT53B | Patil Vikrant Gajananrao |
| 20. | 2016MGMCFT55B | Pensalwar Krishna Balaji |
| 21. | 2016MGMCFT67B | Shidore Vikas Shivaji |
| 22. | 2016MGMCFT73B | Tipale Onkar Kisan |
| 23. | 2016MGMCFT76B | Wadhekar Bharat Dinkar |
| 24. | 2016MGMCFT78B | Walunj Akshay Abasaheb |
| 25. | 2016MGMCFT80B | Yadav Akash Pandurang |

























FOOD TECHNOLOGY
GANDHELI, AURANGABAD

# एमजीएममधील अन्नतंत्रज्ञानच्या वतीने स्वच्छता अभियान व रासेयो सप्ताह साजरा

औरंगाबाद • डीबी स्टार

केंद्र शासनाने सुरू केलेल्या स्वच्छता ही सेवा या स्तुत्य उपक्रमाच्या माध्यमातून आणि रासेयो अंतर्गत १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान एमजीएम अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालय व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान पंधरवाडा आणि महाविद्यालयाच्या वतीने २४ ते ३० सप्टेंबर दरम्यान रासेयो सप्ताह साजरा करण्यात आला.




सर्वप्रथम सगळ्यांनी स्वच्छतेची शपथ घेत आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची प्रतिज्ञा केली. महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी विविध ठिकाणी स्वच्छता विषयक कार्यक्रम, प्रभातफेरी, भाषणे इ. उपक्रम राबवून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.यानंतर महाविद्यालयातील प्रयोगशाळा व कार्यालयाची साफसफाई आणि साईटेकडी मंदिरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

२८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान शिवगड तांडा व भिंदोन या गावातून जि.प. प्रशालेसोबत संयुक्तिक स्वच्छता प्रभातफेरी काढण्यात आली. रासेयो स्वयंसेवकांनी गावात स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणाऱ्या पथनाट्यांच्या तसेच भाषणाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचवला. महाविद्यालयात स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे यासाठी एमजीएम कृषीचे संचालक डॉ. राजेंदर रेड्डी आणि प्राचार्य डॉ. रवींद्र काळे यांनी या उपक्रमांच्या आयोजनासाठी मार्गदर्शन केले तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. महादेव भोसले यांनी सर्व उपक्रमांची उत्तमरीत्या अंमलबजावणी केली.

## एमजीएमतर्फे गांधेलीत महावृक्षारोपण

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी लावणार २ हजार रोपटी

औरंगाबाद | दिव्य मराठीच्या 'एक वृक्ष एक जीवन' अभियानांतर्गत रविवार, ७ ऑगस्ट रोजी महावृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी गांधेली येथील एमजीएम संस्थेची सर्व महाविद्यालये सज्ज झाली आहेत. या वेळी किमान दोन हजार झाडे लावली जाणार असून अनेक संस्था, संघटना आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. सकाळी १० वाजता वृक्षदिंडीने कार्यक्रमाला सुरुवात होणार असून एमजीएम संस्थेचा संपूर्ण स्टाफ त्यासाठी जोरदार तयारी करत आहे.

दिव्य मराठी
वृक्ष जीवन

या वेळी कडुनिंब, शिसू, काशीद, रेन ट्री, चंदन, हिरडा, शिवण, बेहडा, पेल्टोफार्म, वड, पिंपळ, चिंच, मोहगुणी, सप्तपर्णी, बांबू आदी झाडांचा समावेश आहे. गांधेली येथे एमजीएम संस्थेची तीन महाविद्यालये आहेत. त्यामध्ये कॉलेज ऑफ फूड अँड टेक्नोलॉजी, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय आणि कॉलेज ऑफ अॅग्री बायोटेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे. तसेच येथे कृषी विज्ञान केंद्रदेखील आहे. संस्थेने २००७ मध्ये गांधेली येथे १५० एकर जमीन खरेदी केली होती. मात्र, संपूर्ण खडकाळ जमीन असल्याने ती लागवडीयोग्य करण्यासाठी फार प्रयत्न करावे लागले आणि त्याला यशही आले. पाण्याची उपलब्धता आणि सुरक्षित वातावरण हे वृक्षारोपणासाठी ही जागा निवडण्याचे प्रमुख कारण आहे.



एमजीएमच्या गांधेली येथील या टेकडीवर महावृक्षारोपण करण्यात येईल.

#### जिद्द न सोडता वृक्षारोपण सुरूच



विजयअण्णा बोराडे आणि अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण खडकाळ जमीन आम्ही लागवडीयोग्य केली. एक-एक एकराचे तुकडे पाडून तिथे विविध प्रकारची झाडे लावली. संस्थेच्या जागेतील टेकडीवर सुरुवातीला ७ हजार झाडे लावण्यात आली होती. परंतु ती आगीच्या भक्षस्थानी पडली. त्यानंतर तार फेन्सिंग करून सुरक्षितता वाढवली. जिद्द न सोडता आम्ही वृक्षारोपण सुरूच ठेवले. ती झाडे जशी वाढली तशीच रविवारी लावलेली झाडे वाढतील.

बी. एन. चव्हाण, प्राचार्य, कॉलेज ऑफ अॅग्री बायोटेक्नॉलॉजी तथा संचालक



ज्या वातावरणामध्ये विद्यार्थी इथे शिकत आहेत, त्या वातावरणामध्ये वृक्षारोपण करण्याची संधी औरंगाबादकरांना मिळणार आहे. वृक्षारोपणासाठी इथे सुरक्षित वातावरण आहे. त्यामुळे वृक्षप्रेमींनी या मोहिमेत सहभागी व्हावे.

व्ही. एन. शिंदे, प्राचार्य, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय



आमचा संपूर्ण स्टाफ कामाला लागला आहे. पार्किंग, दिंडी व इतर गोष्टींचे नियोजन करत आहोत. पारंपरिक वेशात, आनंदी वातावरणात हा उपक्रम राबवणार आहोत. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी सहकुटुंब यामध्ये सहभागी व्हावे.

डॉ. अशोक रोडगे, असोसिएट डीन तथा प्राचार्य, कॉलेज ऑफ फूड अँड टेक्नॉलॉजी

**तुम्हाला या अभियानामध्ये सहभागी व्हायचे असेल, तर ९२२१९३६९८४ या क्रमांकावर संपर्क साधावा.**



## 'एमजीएम' कॉलेज ऑफ फूड टेक्नोलोजीमध्ये जागतिक अन्न दिवस साजरा

औरंगाबाद/प्रतिनिधी

'एमजीएम' कॉलेज ऑफ फूड टेक्नोलोजीमध्ये १६ ऑक्टोबर हा जागतिक अन्न दिन विविध स्पर्धा, मार्गदर्शन व पोस्टर सादरीकरण अशा उपक्रमांसोबत साजरा करण्यात आला.

जागतिक अन्न दिवस निमित्त 'एमजीएम' कॉलेज ऑफ फूड टेक्नोलोजीमध्ये श्री. तेरकर एस. डी. सहआयुक्त, अन्न व औषधी, प्रशासन यांना विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

मार्गदर्शन करताना त्यांनी विध्यार्थ्यांना काळास्वरूप बदलत गेलेल्या आहार तसेच अन्न सुरक्षा कायद्यामधील बदल, विशेषकरून त्यांनी अन्नसुरक्षा कयदा २००६ चे महत्व पटवून दिले. कायद्यातील झालेले बदल आदी विविध मुद्यांचे महत्त्व सांगितले व त्याचबरोबर त्यांनी अन्नसुरक्षा कायदा २०१३ चे महत्वही पटवून दिले. याप्रसंगी जागतिक अन्नदिन हवामान बदलत आहे.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# रासेयो कार्यक्रमाची वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल

**न्यूज ब्रीफ**

## एमजीएम अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयास रासेयोच्या शिबिरात प्रथम पारितोषिक



**औरंगाबाद**| बंगळुरू येथील कृषी विज्ञान विद्यापीठात ३ ते ९ सप्टेंबरदरम्यान राष्ट्रीय सेवा योजना व युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. देशातील एकूण १९ विद्यापीठांतील रा.से.यो. स्वयंसेवक संघ सहभागी झाले होते. एम. जी. एम. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. प्रा. गणेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली दहा स्वयंसेवकांच्या संघाने राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला. संस्थेचे सचिव अंकुशराव कदम, कृषी संचालक डॉ. राजेंदर रेड्डी, व.ना.म.कृ.वि.चे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महेश देशमुख आणि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र काळे यांनी संघाचे अभिनंदन केले आहे.




## 'एमजीएम' अन्नतंत्र महाविद्यालयाने दोन पदके पटकाविली

औरंगाबाद / प्रतिनिधी

महात्मा गांधी मिशनने द्वितीय ऑलम्पिक व ३४ वा वर्धापनदिन साजरा केला त्यात अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत द्वितीय ऑलम्पिक मध्ये दोन पदके पटकावली.

महात्मा गांधी मिशन या संस्थेने द्वितीय ऑलम्पिक दि ०८/१२/२०१६ ते १०/१२/२०१६ या दरम्यान आयोजित केले होते. द्वितीय ऑलम्पिकमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत दोन पदके पटकावली. एमजीएम अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या केतकी केळकरने बॅटमिंटन या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकावले व विद्यालयाच्या प्राध्यापकांच्या टीमने क्रिकेट या खेळात रौप्यपदक मिळवले.

टीममध्ये सहभाग नोंदवलेले प्राध्यापक प्रा. घाटगे अनुराग प्रा. साळवे राहुल प्रा. कटके एस डी प्रा. जाजू आर एच प्रा. सत्वसे ए एन प्रा. केळापुरे एन एन प्रा. भोसले एम जी प्रा. भूषण आचार प्रयोगशाळा सहाय्यक आदिनाथ बाघ अर्जुन काळूंके कृष्णा लहाने व दीपक पवार हे होते. महात्मा गांधी मिशन या संस्थेने दि २०/१२/२०१६ रोजी ३४ वा वर्धापन दिन साजरा केला. त्यात अध्यक्षीय भाषण करताना विभागीय आयुक्त उमाकांत दांगट, यावेळी उपस्थित विश्वस्त प्रतापराव बोराडे, आमदार विक्रम काळे, अध्यक्ष कमलकिशोर कदम, अंकुशराव कदम, कुलगुरू बी.ए. चोपडे, मधुकर अण्णा मुळे, माजी मंत्री गंगाधर गाडे, डॉ. नितीन कदम, डॉ. पी.एम.जाधव होते. ३४ वा वर्धापन दिनानिमित्त लोकनृत्ये, ढोल ताशे पथक, गीत गायन अशे विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करून साजरा केला व शेवटी 'आओ उजाला करे'मध्ये एमजीएम परिसर मेणबत्त्यांच्या उजेडात न्हाऊन निघाला.

**बुधवार** दि.१९ मे, २०१७ **८**

## एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हुंडा न घेण्याची शपथ



औरंगाबाद / प्रतिनिधी

एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हुंडा ना देणार ना घेणार अशी शपथ आपल्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. रोडगे व प्राध्यापक वृंद यांच्या उपस्थितीत घेतली. आजघडीला मध्यम वर्गीय कुटुंब, शेतकरी, महिला, तसेच तरुण पिढीला प्रगती साधण्याची प्रेरणा मिळावी यासाठी एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या शेवटच्या दिवशी हुंडा ना देणार ना घेणार असा संकल्प निरोप समारंभाच्या कार्यक्रमप्रसंगी केला.

कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतेवेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. रोडगे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना सांगितले की मागील दोन वर्षात शेतकरी आत्महत्यात वाढ झाली असून सरकार बघ्याची भूमिका घेत आहे.

हुंडाबळीसारखे समाजाला लागलेली कीड यामुळे अस्थिरता निर्माण झाली आहे. यासाठी महाविद्यालयाच्या तरुण व तरुणींनी जर हुंडा ना देणार ना घेणार असा प्रण घेतला तर जगात मोठ्या प्रमाणात बदल घडेल व जगासमोर एक मोठा आदर्शही निर्माण होईल व हा उपक्रम बाकी युवकांनी बघितला तर त्यांच्या वैचारिक दृष्टीकोनात बदल घडून येईल असे ते निरोप समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात म्हटले.

यावेळी व्यासपीठावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथिल डी. आर. मोरे, एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्रा. एस. डी. कटके, प्रा. आर. एच. जाजू, प्रा. आर. व्ही. साळवे प्रा. एम. एल. कदम प्रा. ए. एन. सत्वसे प्रा. पी. एस. पाटील प्रा. एन. एन. केळापुरे प्रा. एम.जी. भोसले, प्रा.बी.एम. आचारे, प्रा. जमुना, प्रा.आर.आर. कारले उपस्थित होते.

## एमजीएममध्ये रक्तदान शिबिर

विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांचाही प्रतिसाद



रक्तदान करताना विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग.

**औरंगाबाद • डीबी स्टार**

गांधेली परिसरातील एमजीएम अन्न-तंत्रज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन शिबिरात प्रतिसाद दिला. अपघातातील जखमींना, प्रसवकाळ आणि शस्त्रक्रियेदरम्यान रक्तदानाची मोठी गरज भासते. या स्थितींमध्ये रुग्णास रक्ताची गरज असते. या पार्श्वभूमीवर एक छोटीशी मदत म्हणून एमजीएम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. रोडगे होते. यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी पुढाकार घेतला.

# रासेयो-राष्ट्रीय एकात्मता शिबीर २०१८

## कृषी विज्ञान विद्यापीठ, बेंगळुरू (३ ते ९ सप्टेंबर २०१८)

राष्ट्रिय सेवा योजना तसेच युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान विद्यापीठ, बेंगळुरू येथे सातदिवसीय (३ ते ९ सप्टेंबर २०१८) राष्ट्रिय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसंघाच्या चमूने संघ व्यवस्थापक प्रा. जी. एस. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व.ना.म.कृ.वि. तर्फे महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. सात दिवसांमध्ये स्वयंसेवकांनी विविध उपक्रमांचे प्रशिक्षण घेतले तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन राज्याच्या संस्कृतीचे उत्तमरीत्या सादरीकरण केले. शिबिरातील सर्वंकश सहभाग आणि उत्कृष्ट सादरीकरणासाठी महाविद्यालयास प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.रासेयो - राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी संघ खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रजिस्ट्रेशन क्र. | नांव | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | --------- | प्रा. जी. एस. राऊत (संघ व्यवस्थापक) | सहाय्यक प्राध्यापक |
| २. | 2016MGMCFT34B | के. आर. कदम | तृतीय वर्ष |
| ३. | 2016MGMCFT20B | ए. आर. गायकवाड | तृतीय वर्ष |
| ४. | 2016MGMCFT17B | के. के. धुर्वे | तृतीय वर्ष |
| ५. | 2016MGMCFT35B | पी. पी. काळे | तृतीय वर्ष |
| ६. | 2016MGMCFT23B | के. जे. घुगे | तृतीय वर्ष |
| ७. | 2016MGMCFT76B | बी. डी. वाढेकर | तृतीय वर्ष |
| ८. | 2016MGMCFT52B | एस. एस. पाटील | तृतीय वर्ष |
| ९. | 2016MGMCFT36B | पी. आर. कांबळे | तृतीय वर्ष |
| १०. | 2016MGMCFT21B | के. एस. गायकवाड | तृतीय वर्ष |
| ११. | 2016MGMCFT49B | ए. एस. मार्कंडे | तृतीय वर्ष |






# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

## १. युवक दिन

रासेयो नियमित कार्यक्रमांतर्गत प्रतिवर्षी १२ जानेवारी रोजी युवक दिन साजरा करण्यात येतो. महाविद्यालयात विविध बौद्धिक तसेच मैदानी स्पर्धांचे आयोजन केले जाते. युवकांचे प्रेरणास्थान तसेच आदर्श स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले जाते.

## २. वर्षामंगल कार्यक्रम

प्रतिवर्षी संस्थेच्या वतीने महाविद्यालयात पावसाचे स्वागत करण्यासाठी १५ जून रोजी वर्षामंगल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनासंदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणासंबंधी आत्मीयता निर्माण व्हावी. वृक्षारोपणाचे तसेच पाण्याचे महत्त्व पटावे हा यामागचा मुख्य उद्देश असतो. सदरील उपक्रमास एमजीएम चे सचिव श्री अंकुशराव कदम , सर्व संचालक , प्राचार्य , प्राध्यापक , विध्यार्थी उपस्थितीत राहून वृक्ष लागवड करतात .

## ३. कृषिदिन

१ जुलै हा दिवस कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यादिवशी वृक्षारोपण करून पर्यावरणाप्रती कृतज्ञता केली जाते तसेच पर्यावरण संवर्धनासंबंधी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

## ४. स्वातंत्र्यदिन

विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान टिकून राहावा आणि देशसेवेची भावना वृद्धिंगत व्हावी यासाठी स्वातंत्र्यदिनी महाविद्यालयात सामूहिक पथसंचालनाचे आयोजन करण्यात येते. विविध देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

## ५. शिक्षकदिन

५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात शिक्षकदिन साजरा करण्यात येतो. रासेयो स्वयंसेवक कार्यक्रमाचे आयोजन करतात. या दिवशी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे स्वागत केले जाते तसेच काही विद्यार्थी शिक्षकांची भूमिका साकारून हा दिवस साजरा करतात.

## ६. गांधीजयंती

२ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीचे औचित्य साधत रा से यो स्वयंसेवकानी महाविद्यालय परिसर साफसफाई व स्वच्छता प्रभातफेरी आयोजित करून स्वच्छतेसंदर्भात जनजागृती केली.

## ७. रक्तदान शिबीर

महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक आणि एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २० डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून त्यामुळे कुणाला जीवन मिळू शकते या उद्देशाने महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करतात.

## ८. प्रजासत्ताक दिन

महाविद्यालयात दरवर्षी विविध देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच पथसंचलनाचे आयोजन करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येतो.

## ९. हेरिटेज रन मॅरेथॉन

महाराष्ट्राची ऐतिहासिक राजधानी असलेल्या औरंगाबाद शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा अबाधित राहावा तसेच त्याचा प्रचार व्हावा आणि निरोगी शरीरासाठी धावण्याच महत्व पटून लोक व्यायामास प्रेरित व्हावे या हेतूने संस्थेमार्फत दरवर्षी २० डिसेंबर रोजी हेरिटेज रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यामध्ये रासेयो स्वयंसेवक आयोजनामध्ये सहभाग घेतात.
















वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय
भव्य रक्तदान शिबीर
Mahatma Gandhi Mission's
COLLEGE OF FOOD TECHNOLOGY AURANGABAD.








MGM
SWIM
CYCLE
RUN









महात्मा गांधी मिशन

# एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालय

एमजीएम हिल्स , गांधेली, औरंगाबाद